**स्थायी निदेश क्र.१८**

**नगरपरिषद सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियमांतर्गत अनुज्ञेय आर्थिक लाभ देण्यास कुचराई करणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांचेवरील जबाबदारी निश्चित करणेबाबत.**

नगरपरिषद प्रशासन संचालनालय,
शासकीय परिवहन सेवा इमारत,
३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०३०.
क्र.नपसु १०२२/प्र.क्र.१८५/२००२/कक्ष-६
दिनांक: १४ नोव्हेंबर २००२.

संदर्भ : १) नगरपरिषद प्रशासन संचालनालय, यांचे आदेश क्र.इएसटी ११८४/सीआर २१/५,दि.१४ मे १९८४.
२) नगरपरिषद प्रशासन संचालनालय, स्थायी निदेश क्र.१६, दिनांक ३१ मे २००२
३)नगरपरिषद प्रशासन संचालनालय, पत्र क्र. लोआ१०२०/प्र.क्र.६४८/०१/का-६,दि.१८.१.२००२.

नगरपरिषद आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे आदेश क्र.इएसटी ११८४/सीआर २१/५, दिनांक १४.५.१९८४ ने महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागू केलेले आहेत. तथापि या संचालनालयाचे असे निदर्शनास आले आहे की, बऱ्याच नगरपरिषदांमधील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना त्यांचे अनुज्ञेय निवृत्ती विषयक लाभापासून वंचित ठेवले जाते. निवृत्तीवेतन वेळेवर दिले जात नाही व त्यामुळे संबंधीत सेवानिवृत्त कर्मचारी हे त्यांना अनुज्ञेय असलेल्या लाभापासून नाहक वंचित रहात आहेत.

नगरपरिषदांचे वतीने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना त्यांच्या अनुज्ञेय लाभापासून वंचित ठेवण्याचे प्रमुख कारण म्हणून, नगरपरिषदेची आर्थिक स्थिती बरोबर नसल्याचे कारण वेळोवेळी विशद केले जाते. तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम १२९ ब नुसान विलंबाने प्रदान करण्याच्या रकमेवर व्याज प्रदानाची असलेली तरतूद व असे व्याज विलंबास जबाबदार असणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांचेकडून वसूल करणेबाबत असलेली वैधानिक तरतूद या संचालनालयाचे स्थायी निदेश क्र.१६, दि. ३१ मे २००२ ने सर्व नगरपरिषदांच्या निदर्शनास आणून दिलेली आहे. तथापि, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे देय रकमांस होणाऱ्या विलंबास नगरपरिषदेची खालावलेली आर्थिक परिस्थिती असून नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी जबाबदार नाहीत असा चुकीचा खुलासा काही नगरपरिषद मुख्याधिकाऱ्यांकडून करणेत येतो, हे बरोबर नाही. नगरपरिषदेची आर्थिक स्थिती दुर्बल होण्याचे मुख्य कारण म्हणजे वित्तीय शिस्तीचे / नियमांचे पालन न करणे, नगरपरिषदेत निधी उपलब्ध नसताना कामाचे आदेश देणे, कर्जाचे हप्ते वेळेवर न भरणे, शासकीय देणी प्रदान न करणे, अंदाजपत्रकात उत्पन्नाच्या तरतूदी वाढवून दर्शविणे, नगरपरिषदेच्या उत्पन्नाकडे दुर्लक्ष करणे, कर वसुली १०० टक्के विचारात घेऊन त्याप्रमाणे अंदाजपत्रकात तरतूद करणे. परंतू प्रत्यक्षात कर वसुली अत्यंत कमी करणे, या व या संदर्भातील सर्व बाबी विचारात घेता नगरपरिषदेची आर्थिक शिस्त बिघडविण्यास प्रामुख्याने मुख्याधिकारी, लेखापाल, अंतर्गत हिशेब तपासनीस व संबंधीत अधिकारी व कर्मचारी हेच जबाबदार ठरतात व त्यामुळे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम १२९ ब मधील तरतूदीनुसार सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे निवृत्तीवेतन, उपदान, रजा निधी, निवृत्तीवेतन, अंशराशीकरण इत्यादी रकमा विलंबाने प्रदान केल्यास त्यांचेवरील व्याजाची भरपाई तात्काळ संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांचेकडून जबाबदारी निश्चित करुन वसुलात आणावी.

मुख्याधिकारी हे प्रशासन प्रमुख म्हणून त्यांनी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे दायित्व प्राधान्याने मुदतीत प्रदान करणेच्या दृष्टीने दक्षता घ्यावी तसेच वित्तीय नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे दृष्टीने नगरपरिषदेच्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांना लेखी समज द्यावी. यामध्ये कुचराई झाल्यास त्याची गंभीर दखल घेतली जाईल.

( रमेश म. उबाळे )
संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

प्रति :

१) अध्यक्ष / मुख्याधिकारी ( सर्व नगरपरिषदा )
२) जिल्हाधिकारी ( सर्व ) मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा वगळून
३) आयुक्त व प्रादेशिक संचालक (सर्व )
कोकण / पुणे / नाशिक / अमरावती / औरंगाबाद / नागपूर
४) उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा (सर्व )
५) कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग (नवि-१७) मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
६) कक्ष अधिकारी, मा. लोकआयुक्त कार्यालय, नवीन प्रशासकीय भवन, १ ला मजला, मंत्रालयासमोर, मुंबई ४००  ०३२.